# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


क्र.ससं/उशि/पुवि/नामफलक/मराठी/संकीर्ण/२०२० 1504 दि.१८/०२/२०२०

**महत्वाचे**

प्रति,

१.कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

२.कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

३.कुलसचिव, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे

४.कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

५.कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

६. कुलसचिव/संचालक, सर्व स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे, प्रस्तूत विभाग.

७. प्राचार्य/प्राचार्या, सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, पुणे/अहमदनगर/नाशिक.

विषय:- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे आणि सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था व तत्सम शैक्षणिक संस्था यामध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेतून लावण्याबाबत...

संदर्भ:- शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६०/विशि-३, दि.१५/०२/२०२०.

उपरोक्त विषयाचे संदर्भात उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये नामफलक तसेच संस्थेच्या माहितीबाबत वा अन्य विविध बाबींचे फलक लावण्यात आलेले आहेत. बऱ्याच शैक्षणिक संस्थांमध्ये लावण्यात आलेले फलक इंग्रजी भाषेत असून मराठी भाषेत फलक लावण्यात आलेले नाहीत. यास्तव शासनाने संदर्भिय परिपत्रक निर्गमित केलेले आहे.

या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे:-

१) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील या विभागातील सर्व अकृषी/अभिमत/मुक्त/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे आणि सर्व अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित महाविद्यालये व परिसंस्था यामध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेतून लावण्यात यावेत.

२) ज्या ठिकाणी नामफलक इंग्रजी भाषेमध्ये लावण्यात आले आहेत तेथे सुध्दा सदर फलक इंग्रजी भाषेसह मराठी भाषेतून लावण्यात यावेत.

३) सर्व कुलसचिव/संचालक व संबंधित विद्यापीठे यांनी त्यांच्या अधिनस्त महाविद्यालयांना उपरोक्त सूचना आपल्यास्तरावरुन तात्काळ कळवाव्या. तसेच सर्व महाविद्यालयांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

उपरोक्त निर्देशांचे सर्व शैक्षणिक संस्थांकडून काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(डॉ.मोहन खताळ)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे १.

प्रत:-

१. मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.